

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

**चांदवड जि. नाशिक**

६ वा वार्षिक अहवाल

*** ऋणातुन समृध्दीकडे ***

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

## * वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस *

**६ वी वार्षिक सभा**

**फक्त सभासदांसाठीच**

जा. क्र. वा स. सन. २००७ — दि. २८/७/२००७

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची ''वार्षिक सर्व साधारण सभा'' **रविवार दि. १२/८/२००७ रोजी दुपारी २.०० वा. जैन भवन, मातीच्या गणपती जवळ, सोमवार पेठ, चांदवड** येथे आपल्या संस्थेचे

**चेअरमन मा. श्री. डॉ. अरुण पुंडलिकराव निकम**

यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती !

### * सभेपुढील विषय *

१) मा. नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील वार्षिक साधारण सभेचे प्रोसिडींग वृत वाचुन कायम करणे.
३) सन २००६-२००७ सालाचे नफा-तोटा पत्रक ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.
४) सन २००६-२००७ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २००७-२००८ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
६) सन २००६-२००७ च्या वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.
७) सन २००६-२००७ वर्षाचे ऑडिट मेमोचे वाचन करुन दोष दुरुस्तीस मंजुरी देणे.
८) संस्थेतील फर्निचर व इंटेरियर खर्चाला मान्यता देणे बाबत.
९) मा. अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

### * आपले नम्र *

| | | |
|---|---|---|
| **श्री. विलास आहेर** | **सौ. रेखा महाजन** | **श्री. डॉ. अरुण निकम** |
| मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

**मा. संचालक मंडळ**

### * सुचना *

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि. ४/८/२००७ पर्यंत लेखी कळवावे.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.

सुरक्षितता, विश्वासार्हता आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

## ✻ संचालक मंडळ ✻

**संस्थापक :- श्री. प्रा. निकम टी. पी.**

| | |
|---|---|
| श्री. डॉ. अरुण पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| सौ. रेखा विलासराव महाजन | व्हा. चेअरमन |
| श्री. तुकाराम पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री. देविदास त्र्यंबकराव शेलार | संचालक |
| श्री. निवृत्ती दामोदर निकम | संचालक |
| श्री. अरुण शंकरराव सोनवणे | संचालक |
| श्री. नंदकुमार पुंडलिकराव शेलार | संचालक |
| श्री. सुनिल रामकृष्ण शेलार | संचालक |
| श्री. दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | संचालक |
| श्री. अशोक शामराव माळी | संचालक |
| श्री. दगाजी रामचंद्र बच्छाव | संचालक |
| श्री. रामदास सदाशिव साळवे | संचालक |

## ✻ कर्मचारी वृंद ✻

| | |
|---|---|
| श्री. विलास पंडीतराव आहेर | मॅनेजर |
| श्री. अंबादास पर्बत जेजुरकर | कॅशिअर |
| श्री. गजेंद्र बाळू शेलार | लिपीक |
| श्री. सतीष मुरलीधर आहेर | शिपाई |

## ✻ कायदेशिर सल्लागार ✻

ॲड. श्री. शिवाजीराव महादु सोनवणे

## ✻ चार्टड अकौटन्ट ✻

*श्री. उल्हास बोरसे*

## ✻ वाहन व्हॅल्युअर ✻

श्री. अभयकुमार आर. मेहता, मालेगांव

स्वमालीकीची अद्ययावत भव्य नुतन वातानुकुलित वास्तु व संगणीकीकरण कार्यप्रणाली.

# सन २००६ -२००७ चा वार्षिक अहवाल

सर्व सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सस्नेह नमस्कार...

आज ६ व्या **वार्षिक सर्वसाधारण** सभेसाठी आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मन:पुर्वक स्वागत करतो. दिनांक ३१/३/२००७ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक, ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून जे मोलाचे सहकार्य केले. ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेवून संस्थेने अतिशय कठीण निकष लावून कर्जवाटप, कर्जवसूली व दैनंदिन काम केले आहे. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणून संस्थेला स्थापनेपासून सलग५ वर्षे ''अ तारांकीत'' ऑडीट वर्ग मिळालेला आहे. तर ५ वर्षाच्या अल्पकालावधीत संस्था स्वत:च्या मालकीच्या अद्ययावत भव्य नुतन वातानुकूलीत वास्तुत संगणीकीकरणासह सुसज्ज अवस्थेत आज आपण पहात आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे इवलेसे रोपटे अवघ्या ५ वर्षात त्याचे वटवृक्षात रुपांतर झाल्याचा चमत्कार आपण पहात आहोत. म्हणून चांदवड तालुक्यातील एक अग्रगण्य संस्था म्हणून महात्मा फुले नागरी सह. पतसंस्थेला ओळखले जाते. सुरुवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता विश्वासार्हता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळेच शक्य झालेले आहे. म्हणून संस्थेच्या प्रगतीत व नाव लौकीकात आपला मोलाचा वाटा आहे.

चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था व बँका आहे. त्यांच्याशी निर्मळ स्पर्धा करुन, दुष्काळ, आर्थिक मंदी व महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरुन तरुणांना व्यावसायीकांना कर्जवाटप केले आहे. सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामूळे आम्ही ९८% कर्जवसूली करु शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

दरवर्षी वाढता नफा, वाढते कर्ज वाटप, लवाद दाखल न करता होणारी कर्ज वसूली, वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे. मला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, संस्थेने गेल्या वर्षी ३१/३/२००६ रोजी ८,५८,३७५=०० रुपयाची वास्तु खरेदी केली होती, आणि या वर्षी संस्थेने इंटेरियर डिझाईन साठी ४,६९,१२५=०० रुपये खर्च केले तर कंपनीचे इनव्हर्टर साठी ६५,९००=०० रुपये खर्च केला आहे. स्पर्धेच्या युगात व आवश्यकतेची निकड लक्षात घेवून संस्थेने संपूर्ण कार्यालयीन कामकाजासाठी संगणीकीकरण प्रणाली सुरु केलेली आहे. संस्था वातानुकूलीत करण्यासाठी दोन ए. सी. बसविण्यासाठी ६२,०८०=०० रुपयांची मंजूरी घेतली असून त्यापैकी एक एस. सी. बसविण्यात आलेला आहे. आज महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था ही अंतर-बाह्य सुंदर व सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे. या श्रेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामूळे संस्थापक प्रा. निकम टी. पी. यांच्या स्वप्नांना मुर्त रुप आले आहे. संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारुपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी. पी. हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे आणखी एक पाऊल पुढे पडावे यासाठी मी आपणासमोर संस्थेच्या हिताची भावी योजना मांडणे पसंद करेल. संस्थेला एका सभागृहाची नितांत गरज आहे. आपण सर्वांनी ठरवले तर काम कठीण असले तरी अशक्य नाही असे मला वाटते. दोन वर्षापासून टॅक्स ऑडीटच्या कठीण परीक्षेतून जावून देखील आपल्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. संस्थेने उपविधीत दुरुस्ती करुन कार्यक्षेत्रात वाढ करुन चांदवड कार्यक्षेत्र केले आहे. तसेच कर्जवाटपाची मर्यादा आता १०,००,०००=०० रुपयांपर्यंत केली आहे. अजूनही बरेच काही करावयाचे आहे. विविध योजना आहे. त्यासाठी आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुन:श्च एकदा आपले मन:पूर्वक हार्दिक स्वागत करुन आपल्या शुभेच्छा हृदयाशी बाळगून ६ वा वार्षिक अहवाल आपणापूढे सविनय सादर करीत आहे.

**★ भाग भांडवल :-**

संस्थेने अधिकृत भागभांडवल २५,००,०००=०० असून दिनांक ३१/३/२००७ अखेर वसूल भागभांडवल रुपये ७,६८,४५६=०० रुपये आहे. अहवाल सालात भागभांडवल रुपये १,९९,३००=०० ने वाढ झालेली आहे.

**★ राखीव व इतर निधी :-**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण स्वनिधी वरुन लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि. ३१/३/२००७ अखेर संस्थेचा निधी रुपये १८,३६,०२८=५० असून अहवाल वर्षात निधीमध्ये रुपये ५,६०,००७=०० ने वाढ झालेली आहे.

**★ ठेवी :-**

संस्थेचे उत्कृष्ठ कामकाज व संस्थेवर दृढ विश्वास यामूळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामूळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. ठेवीत होणारी वाढ ही सभासद व स्नेही परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. अहवाल वर्षात ठेवीमध्ये रुपये ५१,८७,१५७=०० वाढ झालेली असून या वर्षा अखेर संस्थेच्या ठेवी रुपये १,९२,८४,८९३=०० इतक्या आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छितो.

**★ कर्ज वाटप :-**

संस्थेने व्यापारी, उद्योजक, शेतकरी, शेतमजूर, कामगार मजूर इत्यादी सर्व गरजू व होतकरु लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातुन कर्ज वाटप केलेले आहे. कर्ज वाटप करतांना कर्जदारावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, परत फेडीची क्षमता, त्याची विश्वासार्हता, व गुणात्मक कसोटीच्या आधारे रुपये १,१६,८५,११४=०० इतके कर्ज वाटप केलेले आहे. गतवर्षाच्या तुलनेत कर्जवाटपात रुपये ३२,७६,८६८=०० ने वाढ झालेली आहे.

**★ थकबाकी :-**

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थांच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. परतु कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दिनांक ३१/३/2007 अखेर संस्थेनेर ९८% इतकी कौतुकास्पद कर्जवसूली केली आहे. कोणत्याही सभासदावर आपण कठोर कार्यवाही केलेली नाही. यावर्षी १00% कर्जवसूली करुन निरंक थकबाकी करण्याचा मानस आमचा आहे. त्यासाठी सर्व सभासदांनी सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. मागील दोन वर्षापासून एन. पी. ए. लागू झालेला नाही. एन. पी. ए. ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन. पी. ए. चे प्रमाण ६.५0% इतके आहे.

**★ गुंतवणूक :-**

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी. डी. रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे पालन केलेले आहे. संस्थेने नियोजनपूर्वक पध्दतीने रुपये ९0,४६,९३५=00 रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. गत वर्षाच्या तुलनेने गुंतवणूकीमध्ये रुपये ३५,४३,१४0=00 ने वाढ झालेली आहे.

**★ संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झालेल्या असून संचालकांनी स्वत:ची कामे बाजूला ठेवून संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे. म्हणून संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा बाळगतो.

**★ नफा :-**

गुणात्मक कर्जवाटप व कमाल कर्जवसुल, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला ३,९0,000=00 रुपयांचा निव्वळ नफा झालेला आहे. सदरच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहून नियमाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहे. प्रतिवर्षी वाढता नफा ही संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे.

### ★ कर्मचारी परिवार :-

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम, प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ४ कर्मचारी वर्ग लाभलेले आहे. संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रमाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

### ★ लेखा परिक्षण :-

संस्थेच्या लेखा परिक्षणावरुन संस्थेचे खरे चित्र समजते. संस्थेला गेली पाच वर्षापासून सतत ''अ स्टार'' ऑडीट वर्ग मिळत होता. परंतु या वर्षी कामकाजातील किरकोळ त्रुटींमूळे १० गुण कमी मिळाले. त्यामूळे संस्थेला प्रथमच 'अ' ऑडीट वर्गावर समाधान मानावे लागले. संस्थेने पुन्हा एकदा उत्कृष्ठ कामकाज करुन 'अ तारांकित' वर्ग मिळविण्यासाठी कंबर कसली आहे.

### ★ सामाजिक बांधिलकी :-

संस्थेने तिसगांव येथील विद्यालयाच्या प्रांगणात ५० रोपांचे वृक्षारोपण केले. तसेच महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य सेवा संस्था नागपूर यांच्या सहकार्याने ३०/५/२००७ ते ३०/६/२००७ असे एक महिन्याचे मोफत चुंबकीय शिबीर घेवून ३०० रुग्णांवर उपचार केला.

### ★ आभार :-

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निबंधक डॉ. सोपानराव शिंदे, सहकार खात्यातील व बँकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी, श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), श्री. उल्हासराव बोरसे साहेब (सी. ए.), संस्थेचे वाहन व्हॅल्युअर श्री. अभियकुमार मेहता (मालेगांव), सहकार, राजकीय, शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन केले, भेटी देवून सूचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(श्री. डॉ. अरुण निकम)
चेअरमन

**माणसांवर विश्वास ठेवण्यापेक्षा विश्वासावर पैसा ठेवा.**

# * ताळेबंद पत्रक *

| दि. ३१/३/२००६ अखेर रुपये | | भांडवल व देणी | दि. ३१/३/२००७ अखेर रुपये | | रुपये | |
|---|---|---|---|---|---|---|
| २५,००,००० | ०० | अधिकृत भाग भांडवल | | | २५,००,००० | ०० |
| ५,८७,९५६ | ०० | वसुल भाग भांडवल | ७,८६,४५६ | ०० | | |
| १२,७६,०२१ | ५० | निधी | | | १८,३६,०२८ | ५० |
| २,१७,५७२ | ०० | राखीव निधी | ३,२०,५०२ | ०० | | |
| ९,२५,५४४ | ०० | इमारत निधी | १०,९८,२१४ | ०० | | |
| १,४५१ | ०० | लाभांश समिकरण निधी | १,४५१ | ०० | | |
| ३०,७५८ | ०० | सभासद कल्याण निधी | ८६,३८० | ०० | | |
| २९,७७४ | ०० | विमा निधी | ५३,८८० | ५० | | |
| १५,५८० | ०० | झिज फंड | २१,४४४ | ०० | | |
| २५,३४२ | ०० | संशयीत व बुडीत कर्ज निधी | २५,३४२ | ०० | | |
| ३०,००० | ०० | बोर्ड व स्टाफ ट्रेनिंग फंड | २८,८९५ | ०० | | |
| -- | -- | फर्निचर निधी | २,००,००० | ०० | | |
| १,४०,९७,७३६ | ०० | ठेवी | | | १,९२,८४,८९३ | ०० |
| १,१८,२२,४०३ | ०० | मुदत ठेव | १,६४,२०,१४९ | ०० | | |
| ७,६९,५०० | ०० | दामदुप्पट ठेव | ६,७९,५०० | ०० | | |
| ९,३६,३८५ | ०० | अल्पबचत ठेव | ९,०६,३९५ | ०० | | |
| ५,५१,८२९ | ०० | सेव्हींग | ११,५०,७१० | ०० | | |
| १७,६२९ | ०० | सुरक्षा ठेव | २८,२१९ | ०० | | |
| ३,३६,१७४ | ५० | देणी व तरतुद | | | १,४२,१३० | ५० |
| २१,५५० | ०० | ऑडीट फी | २७,२१९ | ०० | | |
| ६,५०० | ०० | शिक्षण फी | ६,५०० | ०० | | |
| १,२०,२८१ | ५० | ठेवीवरील व्याज देणे | ६४,१११ | ५० | | |
| ६,००० | ०० | ऑफीस भाडे देणे | ५,००० | ०० | | |
| ५०० | ०० | व्यवसाय कर देणे | -- | -- | | |
| १,०१,३२४ | ०० | कर्जावरील व्याज येणे | -- | -- | | |
| ५,००० | ०० | आयकर तरतुद | ५,००० | ०० | | |
| ३०,००० | ०० | एन. पी. ए. तरतुद | ३०,००० | ०० | | |
| २०,००० | ०० | सभासद कल्याण निधी | -- | -- | | |
| २५,०१९ | ०० | थकित येणे व्याज तरतुद | -- | -- | | |
| -- | -- | सेवक सानुग्रह अनुदान | ४,३०० | ०० | | |
| ३,९०,००० | ०० | नफा | ३,९०,००० | ०० | ३,९०,००० | ०० |
| १,६६,८७,०८८ | ०० | एकुण- | | | २,२४,३९,५०८ | ०० |

| दि. ३१/३/२००६ अखेर रुपये | | जिंदगी व येणी | दि. ३१/३/२००७ अखेर रुपये | | रुपये | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८,१७,१५५ | ०० | बँक व रोख शिल्लक | | | २,७९,७१२ | ०० |
| ७०,९४० | ०० | हातातील रोख शिल्लक | ७,९८४ | ०० | | |
| ७,३३,५६१ | ०० | एन. डी. सी. सी. बँक चालु खाते, चांदवड | १,२६,८१० | ०० | | |
| १०,१२,६५४ | ०० | एन. डी. सी. सी. बँक सेव्हींग, चांदवड | १५,२७० | ०० | | |
| -- | -- | ना. म. को. शाखा, चांदवड | २२,६२८ | ०० | | |
| -- | -- | एस. बी. आय. बँक शाखा चांदवड | १,०७,८२० | ०० | | |
| ५५,०३,७९५ | ०० | गुंतवणूक | | | १०,४६,९३५ | ०० |
| ५२,७९,२१६ | ०० | एन. डी. सी. सी. बँक शाखा चांदवड | ४३,१५,५५० | ०० | | |
| -- | | एस. बी. आय. बँक शाखा चांदवड | २९,००,००० | ०० | | |
| -- | ०० | ना. म. को. शाखा, चांदवड | १५,०१,००० | ०० | | |
| ५,००० | ०० | लॉकर्स डिपॉझीट | १०,००० | ०० | | |
| २,१४,४३७ | ०० | रिझर्व्ह फंड | ३,१५,०७२ | ०० | | |
| ५,१४२ | ०० | बँक इमारत फंड | ५,३१३ | ०० | | |
| ८४,०८,२४६ | ०० | कर्ज | | | १,१६,८५,११४ | ०० |
| १३,७८,१५१ | ०० | वेयक्तीक | १७,७४,५२६ | ०० | | |
| १५,७५,२५७ | ०० | हायरपर्चेस | २६,९४,७६४ | ०० | | |
| २३,७४,८९३ | ०० | मॉरगेज | २८,७७,९९७ | ०० | | |
| १४,०१,३६० | ०० | नजरगहाण | १२,८९,३९१ | ०० | | |
| २,९५,३८२ | ०० | गृहतारण | १०,८४,१३३ | ०० | | |
| ८,१७,४२० | ०० | सोनेचांदी तारण | १३,५२,५५३ | ०० | | |
| ३,००,५०० | ०० | मुदत ठेव ॲडव्हान्स | २,८१,५०० | ०० | | |
| २,६५,२७५ | ०० | अल्पबचत ॲडव्हान्स | ३,३०,२५० | ०० | | |
| ४०,०१९ | ०० | इतर येणे | | | ४०,०१९ | ०० |
| १५,००० | ०० | ऑफीस डिपॉझीट | १५,००० | ०० | | |
| २५,०१९ | ०० | येणे व्याज | २५,०१९ | ०० | | |
| ८,५८,३७५ | ०० | कायम मालमत्ता | ८,५८,३७५ | ०० | ८,५८,३७५ | ०० |
| ५८,६३५ | ०० | डेड स्टॉक | ५८,६३५ | ०० | ५८,६३५ | ०० |
| ८६३ | ०० | लायब्ररी | १,५९३ | ०० | १,५९३ | ०० |
| -- | -- | फर्निचर डेड स्टॉक | ४,६९,१२५ | ०० | ४,६९,१२५ | ०० |
| १,६६,८७,०८८ | ०० | एकुण- | | | २,२४,३९,५०८ | ०० |

मॅनेजर- श्री. विलास आहेर    व्हा. चेअरमन- श्री. देविदास शेलार    चेअरमन- श्री. डॉ. अरुण निकम

॥ विना सहकार नही उध्दार ॥

# नफा - तोटा पत्रक

दि. १/४/२००६ ते ३१/३/२००७ अखेर

| तपशिल | रक्कम रुपये | पैसे | तपशिल | रक्कम रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | १७,१०,१४८/- | ०० | ठेवीवरील व्याज | १३,६९,६३०/- | ०० |
| ठेवीवरील व्याज | १,२३,२०३/- | ५० | अल्पबचत कमिशन | १,०५,८८५/- | ०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ३,०८,४३०/- | ०० | पगार खाते | ९४,९००/- | ०० |
| अल्पबचत कमिशन | २,००८/- | ०० | डि. डि. कमिशन | ३,६९१/- | ०० |
| अल्पबचत स्टेशनरी | ६२०/- | ०० | लॉकर भाडे | १,०००/- | ०० |
| डि. डि. कमिशन | ७,८००/- | ०० | पोस्टेज व टेलिफोन | ६,९७३/- | ०० |
| नोटीस खर्च | ३,०००/- | ०० | ऑफिस भाडे | १२,०००/- | ०० |
| इतर उत्पन्न | ४८०/- | ०० | प्रिंटीग व स्टेशनरी | ३६,३७९/- | ०० |
| वसुली खर्च | ८५०/- | ०० | किरकोळ खर्च | १७,०११/- | ०० |
| | | | लाईट बील | १७२०/- | ०० |
| | | | शिक्षण निधी | ५,०००/- | ०० |
| | | | ऑडिट फी | २०,०००/- | ०० |
| | | | प्रवास खर्च | १,६०५/- | ०० |
| | | | बँक चार्जेस | १,१२७/- | ०० |
| | | | व्यवसाय कर | ५००/- | ०० |
| | | | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ९,१६१/- | ०० |
| | | | जाहिरात खर्च | ४,४००/- | ०० |
| | | | वार्षिक वर्गणी | ५०/- | ०० |
| | | | आयकर सल्लागार | ९५०/- | ०० |
| | | | सहकार शताब्दी वर्ष | १,०००/- | ०० |
| | | | सामाजिक कार्यक्रम खर्च | २,२२०/- | ०० |
| | | | ग्रामपंचायत कर | १,३६२/- | ०० |
| | | | घसारा खर्च | ५,८६४/- | ०० |
| | | | ठेवीवरील व्याज देणे | ६४,१११/- | ५० |
| | | | नफा | ३,९०,०००/- | ०० |
| एकुण :- | २१,५६,५३९/- | ५० | एकुण :- | २१,५६,५३९/- | ५० |